# अधिकाधिक कौशल्यांमुळे विद्यार्थ्यांना यशाची प्राप्ती

## धीरज बोरकर : साखळी सरकारी महाविद्यालयात भरतीपूर्व कौशल्य विकास कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १९ :** आजच्या स्पर्धात्मक काळात नोकरी मिळविण्यासाठी केवळ सैद्धांतिक ज्ञान असणे पुरेसे नाही तर विद्यार्थ्यांकडे कौशल्यांचा संच असणे आवश्यक आहे, अधिकाधिक कौशल्यांमुळे विद्यार्थ्यांना यशाची प्राप्ती होऊ शकते, असे प्रतिपादन सायकोमेट्रिक्स करिअर सल्लागार धीरज बोरकर यांनी केले.

कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, साखळी येथील वाणिज्य विभाग आणि स्मार्ट एज्युकेशन विभाग फोंडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या भरतीपूर्व कौशल्य विकास कार्यक्रमात ते बोलत होते.



**साखळी : मुख्य मार्गदर्शक सायकोमेट्रिक्स करिअर सल्लागार धीरज बोरकर यांच्यासोबत वाणिज्य विभागाचे प्रमुख सहयोगी प्राध्यापक प्रशांत भोसले, सहभागी विद्यार्थी व इतर मान्यवर.**

यावेळी वाणिज्य विभागाचे प्रमुख सहयोगी प्राध्यापक प्रशांत भोसले, सहायक प्राध्यापिका यक्षिता वेंगुर्लेकर आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचा उद्देश वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेशी संबंधित क्षेत्रात करियर करण्यासाठी आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करणे हा होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख मार्गदर्शक धीरज बोरकर यांची ओळख व परिचय प्रा.प्रशांत भोसले यांनी करून दिला. प्रा.यक्षिता वेंगुर्लेकर यांनी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. आभार सर्वशक्ती घाडी यांनी मानले.

### चाचण्यांमुळे विद्यार्थ्यांना क्षमतेची जाणीव

सायकोमेट्रिक्स करिअर सल्लागार धीरज बोरकर यांनी विद्यार्थ्यांना मानसोपचार मूल्यांकन आणि वैयक्तिक कौशल्य मूल्यांकन या दोन चाचण्यांची माहिती दिली. या चाचण्यांमुळे विद्यार्थ्यांना त्यांची आवड, क्षमता, मर्यादा आणि संभाव्य करिअरचे मार्ग ओळखता येतात, असेही बोरकर म्हणाले.

### स्पर्धात्मक आणि प्रमाणपत्र परीक्षांबद्दल माहिती

यावेळी बोरकर यांनी वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांना विविध स्पर्धात्मक आणि प्रमाणपत्र परीक्षांबद्दल माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशाचा आलेख उंचावण्यांसाठी कोणती धोरणे आखली पाहिजेत, यावरही बोरकरांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला ६१ विद्यार्थी सहभागी होते.

# बार्सेतील जनतेला पाणीटंचाईतून आमदार डिकॉस्टा यांचा दिलासा

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि.१८ : केपे मतदारसंघातील पाडी-बार्से येथे पाण्याचा पंप बिघडल्याने सलग तीन दिवस पाणीपुरवठा बंद होता. ग्रामस्थांना याचा मोठा त्रास सहन करावा लागला. केपेचे आमदार एल्टन डिकॉस्टा यांनी पाडी-बार्से येथील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्येवर तत्काळ तोडगा काढला.

सलग तीन दिवस पाणीपुरवठा बंद असल्याने ग्रामस्थ अडचणीत आले होते. नागरिकांकडून माहिती मिळताच, आमदार डिकॉस्टा यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पाणीपुरवठा अधिकाऱ्यांना त्वरित निर्देश दिले आणि टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था केली.

जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र तत्पर असलेल्या आमदार डिकॉस्टा यांची कार्यपद्धती प्रशंसनीय आहे. आपल्या मतदारसंघातील जनतेच्या समस्या जाणून त्या सोडवण्यासाठी त्यांनी दाखवलेली तत्परता कौतुकास्पद आहे. लोकहिताचा विचार करून त्यांनी दाखवलेल्या संवेदनशीलतेमुळे केपेच्या जनतेत समाधान व विश्वास निर्माण झाला आहे. त्यांच्या कार्यक्षम व लोकाभिमुख नेतृत्वाबद्दल मतदारसंघातील नागरिकांनी तसेच पाडी येथील लोकांनी त्यांचे आभार मानले आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयकाराने मठग्रामनगरी दुमदुमली

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि.१९: हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमातील जयजयकाराने बुधवारी मठग्राम (मडगाव) नगरी दुमदुमली. 'नम्स पार्वती पते हर हर महादेव', 'जय भवानी', 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'चा जयजयकार, ढोल-ताशांचा गजराने मठग्राम नगरी भरून गेली. 'शिवसाम्राज्य संघटना', 'राजे बॉयस', मडगाव नगरपालिका तसेच विविध संघटनांनी शिवजयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमांत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम, अतुलनीय कार्य, जनकल्याणकारक राज्यकारभार, ध्येय-धोरणे एकूण लोकहिताय आदर्श राज्यकारभार यांना उजाळा मिळाला. यावेळी झालेल्या विविध कार्यक्रमांत छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आत्मसात करून मार्गक्रमण करण्याचे आवाहन मान्यवरांनी केले.

शिवसाम्राज्य संघटना', राजे बॉयस्, मडगाव नगरपालिका यांनी एकत्र येऊन आयोजित केलेली भव्य मिरवणूक हाऊसिंग बोर्डयेथून सुरू झाली. आमदार उल्हास तुयेकर, आमदार विजय सरदेसाई, आमदार आलेक्स रेजिनाल्ड लॉरेन्स, भाजप नेते शर्मद पै रायतूरकर, नगरसेवक, शिवसाम्राज्य संघटनेचे अध्यक्ष रघुवीर शिरोडकर, राजे बॉयस् चे तथा नगरसेवक रवींद्र नाईक, इतर पदाधिकारी, नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोठ्या संख्येने आबालवृद्ध, युवावर्ग या वाहन मिरवणुकीत सहभागी झाले होते. मिरवणुकीच्या सुरूवातीला आमदार विजय सरदेसाई, आमदार उल्हास तुयेकर, आमदार आलेक्स रेजिनाल्ड लॉरेन्स यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. सुवासिनींनी ओवाळले. त्यानंतर ही वाहन मिरवणूक नियोजित मार्गाने मार्गस्थ झाली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचे वाहनात विराजमान झालेले भव्य पुतळे सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी पताके लावण्यात आले होते. मोक्याच्या ठिकाणी विद्युत रोषणाई करण्यात आली होती. शुभेच्छा देणारे फलक ही लक्ष वेधून घेत होते. एकूण वातावरण शिवमय झाले होते. दवर्लीतील श्री मारुती मंदिराजवळ छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्या जवळल ही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराचे आचरण व्हावे

**निवृत मुख्याध्यापक परब : हरमल शिवजयंती उत्सव**

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १९ :** छत्रपती शिवाजी महाराज हिंदवी स्वराज्य संस्थापक होते. त्यांनी देशाच्या अनेक प्रांतात घुसून रयतेचे राज्य स्थापन केले.



**हरमल : नाट्यप्रवेश स्पर्धेचे उद्‌घाटन केल्यानंतर बोलताना अध्यक्ष संतोष कोरकणकर. सोबत दादू परब, सरपंच संतान फर्नांडिस, पंच सुशांत गावडे, रघुनाथ नाईक,परीक्षक व अन्य.**

गोव्यात बाटाबाटीला आळा घातला व पाद्र्याना हाकलून लावले होते. त्यांच्याकडे एकनिष्ठ मावळे होते व त्यांच्या साहाय्याने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, त्या त्यांच्या गुणाचे आचरण करण्याचे प्रयत्न झाले पाहिजे, असे मत निवृत्त मुख्याध्यापक तथा कला गौरव पुरस्कार विजेते दादू परब यांनी व्यक्त केले.

हरमल सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आयोजित शिवजयंती उत्सवानिमित्त नाट्यप्रवेश स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक पराक्रम करून रयतेला न्याय दिला. धुरंदर व तितकाच कडवा पुरोगामी विचारांचा पगडा असल्याने त्यांनी श्री देवी भवानी मातेला प्रणाम मानून कार्य केले. 'झाले बहु होतील बहु, परंतु या सम हा, असे परब यांनी व्यक्त केले.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष संतोष कोरकणकर यांनी आढावा घेतला. शिवराज्याभिषेक सोहळ्यास ३५० वर्षे पूर्ण झाल्याने, सार्वजनिक मंडळाने शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला. युनायटेड बोयाजच्या सहकार्याने शिव रॅली तसेच नाट्यप्रवेश, कीर्तन, वेशभूषा सादरीकरण असे अनेक उपक्रम राबवले. केवळ श्री गणेश पूजन उत्सव न करता, आरोग्य शिबिर, रक्तदान, भजन, दीपावली अशा अनेक सणांचे महत्त्व भावी पिढीकडून संवर्धन होण्यासाठी पुरकर्त्यांच्या सहयोगाने होत असल्याचे अध्यक्ष कोरकणकर यांनी सांगितले.

यावेळी व्यासपीठावर सरपंच संतान फर्नांडिस, पंच सुशांत गावडे, परीक्षक विनायक नागवेकर व श्याम नागवेकर उपस्थित होते.

प्रारंभी साहित्यिक दादू परब व सरपंच संतान फर्नांडिस यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. मंडळाचे उपाध्यक्ष सुखानंद नाईक, रंगनाथ नाईक, उपसचिव राजू गावडे व उपखजिंदर राघोबा गावडे यानी मान्यवरांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सूत्रनिवेदन व आभार मंडळाचे सचिव चंद्रहास दाभोलकर यांनी केले. तद्‌नंतर पेडण्यतील नाट्यसंस्थांनी प्रवेश सदर केले.

# माकाझान-कुंकळ्ळी मध्ये भूमिगत केबलिंग सुरू

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि.१८ : माकाझान येथे भूमिगत विद्युत तारा टाकण्याचे काम सुरू झाले असून, आमदार युरी आलेमाव यांनी या पकल्पामुळे वीज जाळे बळकट होऊन ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा होणार, असे म्हटले. विरोधी पक्षनेते युरी आलेमाव म्हणाले की, माकाझान येथील सध्याचे १० ट्रान्सफॉर्मर १०० केव्हीएवरून २०० केव्हीएपर्यंत अपग्रेड केले जातील आणि दोन अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येतील. एप्रिल २०२५ पर्यंत हे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्यामुळे पावसाळ्यात वीजपुरवठा खंडित होणार नाही. या प्रकल्पामुळे भूमिगत तंत्रज्ञानाद्वारे पायाभूत सुविधा बळकट करून सुरक्षित, आणि अखंडित वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. यामुळे माकाझानच्या जनतेला मोठा दिलासा मिळणार आहे, असे आलेमाव यांनी सांगितले.

आलेमाव म्हणाले की, त्यांनी कुंकळ्ळीच्या लोकांच्या मूलभूत गरजांवर लक्ष केंद्रित केले आहे आणि म्हणूनच भूमिगत विद्युत केबल सुरू करण्यात आली आहे. पावसाळ्यात विजेच्या तारांवर झाडे पडण्याच्या घटना घडतात. त्यामुळे नागरिकांना वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येला सामोरे जावे लागते. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे असे ते म्हणाले. आलेमाव म्हणाले की, मतदारसंघात भूमिगत केबलचे जाळे पूर्ण झाल्यानंतर किमान पुढील ३० वर्षे लोकांना अशा समस्यांना सामोरे जावे लागणार नाही. केबल टाकण्यासाठी खोदण्यात येणाऱ्या रस्त्यांवरील गैरसोय नागरिकांनी सहन करावी, असे आवाहन त्यांनी केले.

# विज्ञानधारेची रेकॉर्डब्रेक कामगिरी ; ५५० हून अधिक व्याख्याने

**डॉ. महेश माजिक यांची माहिती : ७ मार्चला होणार समारोप; भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन**

■ टीम दैनिक हेराल्ड



> **विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणीव आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणरी विज्ञानधारा व्याख्यानमाला केंद्र सरकारच्या विकसित भरत २०४७ या संकल्पना पूर्तीतील महत्त्वाचा घटक ठरणार आहे.**
> **-भूषण सावईकर,**
> **संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पर्वरी.**

पर्वरी, दि. १९ : २०४७ पर्यंत वैज्ञानिक क्षेत्रात जागतिक पातळीवर अग्रेसर होण्याचे ध्येय भारताने बाळगले असून ते पूर्ण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा उपक्रम म्हणून विज्ञानधारा व्याख्यानमालेची ओळख बनलेली आहे. ४ जानेवारी २०२५ मध्ये सुरू झालेल्या विज्ञानधारा व्याख्यानमालेंतर्गत आतापर्यंत राज्यात ५५० व्याख्याने पूर्ण झाली आहेत. दि. २८फेब्रुवारीपर्यंत हा आकडा सहाशेच्यावर पोहोचेल, अशी माहिती विज्ञानधारा व्याख्यानमालेचे मुख्य समन्वयक आणि शास्त्रज्ञ डॉ. महेश माजिक यांनी दिली. विज्ञानधारा व्याख्यानमालेचा समारोप दि. ७ मार्च रोजी कला आणि संस्कृती खात्याच्या बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, राज्याचे शिक्षण सचिव प्रसाद लोलयेकर, उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर, विज्ञानधारेचे समन्वयक ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विठ्ठल तिळवी उपस्थित असतील, अशी माहितीही डॉ. महेश माजिक यांनी दिली. राष्ट्रीय पातळीवरील विज्ञान संस्थांमधील शास्त्रज्ञ, विद्यापीठ, महाविद्यालयांमधील प्राध्यापक अशा जवळपास ३०० व्याख्यात्यांनी विद्यापीठ, महाविद्यालये, उच्च माध्यमिक, माध्यमिक स्तरावर मार्गदर्शन केलेले आहे, असेही यावेळी डॉ. महेश माजिक म्हणाले.

### प्रदर्शनांमधून संशोधनात्मक प्रकल्पांना चालना

विज्ञानधारेच्या समारोपानिमित्ताने विज्ञान प्रदर्शनात विज्ञान शाखेत तिसऱ्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वाध्यायासाठी निवडलेल्या प्रकल्पांचे प्रदर्शन या निमित्ताने होणार आहे. कल्पक प्रदर्शनामध्ये खगोलशास्त्र, रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, ड्रोन, रोबोटिक्स, भौतिकशास्त्र या विषयांमधील कल्पनाप्रधान विषयांची मांडणी केली जाणार आहे. कला आणि संस्कृती खाते भवनात दि. ५ ते ७ मार्च या दरम्यान ही प्रदर्शने सकाळी १० ते सायंकाळी ५ या दरम्यान खुली असून विद्यार्थी व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. माजिक यांनी केलेले आहे.

### यंदा प्रथमच गोवा रिसर्च स्कॉलर मीटचे आयोजन

विज्ञानधारेच्या समारोपानिमित्ताने गोवा रिसर्च स्कॉलर मीटचे आयोजन करण्यात आले असून गोव्यात पीएच.डी करणाऱ्या ५० संशोधक विद्यार्थ्यांना दि.५ ते ७ दरम्यान एकत्र आणले जाणार आहे. यावेळी या विद्यार्थ्यांना बेंगलोर येथील डॉ.रवीशंकर भट मार्गदर्शन करतील अशी माहितीही डॉ. माजिक यांनी दिली.

# 'नवदुर्गा' सोसायटीच्या अध्यक्षपदी संतोष नाईक बिनविरोध



**पाळी : नवनिर्वाचित अध्यक्ष संतोष नाईक यांच्यासह नूतन समिती.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १९ :** पाळी येथील श्री नवदुर्गा विकास कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीच्या संचालक मंडळाची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यात अध्यक्षपदी संतोष नाईक यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या सक्षम मार्गर्शनाखाली या संस्थेच्या संचालक मंडळाची निवड झाली.

उपाध्यक्षपदी किशोर भावे, संचालक उल्हास नार्वेकर, प्रेमानंद परब, शिवानंद गावंडळकर, प्रसाद सावंत, सर्वेश गावस, भालचंद्र गावस, विभा गावस, दशवंती तोर्लेकर, प्रज्ञा काणेकर यांची निवड करण्यात आली. नूतन संचालक मंडळाचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी अभिनंदन केले आहे.

**पाहिजेत**

Wanted one Primary Teacher on Contractual basis. Walk in interview with relevant documents on 24/02/2025 at 10.00 a.m. at Santa Cruz Primary School, Santa Cruz ,Tiswadi –Goa

**NOTICE**

My Mother **Late Debhashri Desai** was owning **Honda Activa 6G DLX Scooter** bearing **Reg. No. GA-06-AC-4429.** After her death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

**Date: 19.02.2025**

Sd/-
**Archana Digambar Desai**
H. No. 230, Behind Cross, Belabai Orulem, Vasco da Gama, South Goa 403802

*Sandeep Ads*

**IN THE COURT OF JOINT MAMLATDAR VI OF BARDEZ TALUKA AT MAPUSA, GOA**

**Mutation Case No: 100291 Village: Parra**

Jane Cecylia Pretto E Pacheco, R/o H. No. 393, Almeida Vaddo, Parra, Bardez, Goa .....Applicant

V/s

Caitano Caetano Pacheco alias Simon Cajetan Pacheco alias Caetano Pacheco alias Caitano Pacheco Simon Cajetan Pacheco ....Opponents

**PUBLIC NOTICE**

To all Opponents / Legal Heirs / any other interested parties

Whereas the applicant Jane Cecylia Pretto E Pacheco, R/o. H.No. 393, Almeida Vaddo, Parra Bardez Goa has applied for mutation under section 96 of L.R.0 1968 to include her name alongwith her son Baptist Joseph Pacheco after deleting the existing name of Simon Cajetan Pacheco in occupant column of Sy No. 201/7-B of Village Parra for an area admeasuring 300 Sq. mtrs as Co occupant as per will drawn on 23-11-2020 recorded at Folio 96 V to 97 V of Book No. 355 executed before Civil Registrar Bardez.

Whereas, the notices in Form no. X was issued. However some notices could not be served as party expired.

And whereas, the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicant does not know the legal heirs and the addresses of the interested parties.

All the interested parties are hereby given the notice of the said mutation entry and called upon to submit to me their objections if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying officer.

Mapusa, Dated: 18/02/2025

Sd/- **Saiesh S. Naik** (Seal)
Joint Mamlatdar VI of Bardez Taluka, Mapusa

**VILLAGE PANCHAYAT REVORA**
**Bardez - Goa**

Ref. No. VP/REVORA / Quotation Notice/ 2024-25/ 1038
Date: 18/02/2025

**NOTICE INVITING QUOTATION**

Village Panchayat Revora invites sealed Quotations from the approved / authorized dealers / agencies for

| Sr. No. | Particulars of Item | Cost per Item |
|---|---|---|
| 1. | Supply of Plastic Chairs for Village Panchayat Revora, Bardez Goa | Per Unit |
| 2. | Supply of Sound System for Village Panchayat Revora, Bardez Goa | ------ |

The quotations shall reach in the office of Village Panchayat Revora, Bardez, Goa upto 12:00 noon on 28/02/2025.

**1)** The quotation will be opened on 01/03/2025 at 11:00am in the Village Panchayat Meeting.
**2)** The Lowest quotation will be accepted.
**3)** The right of accepting or rejecting any or all quotation without assigning any reason is reserved by the Village Panchayat Revora.
**4)** For complete description of work, specification & details contact V.P. Revora.
**5)** Rate quoted should be inclusive of all taxes and Transportation Charges.

Sd/- **Smt. Kanchan V. Gaonkar( Sarpanch )**
**Village Panchayat Revora**

**VILLAGE PANCHAYAT ALORNA, PERNEM-GOA**

Ref.No. No. V.P/ALO/PER/Ten-Notice/2024-25/ 643
Date: 19/02/2025

**TENDER NOTICE**
**(e-Tendering with e-payment mode)**

The Office of Village Panchayat Alorna, Pernem – Goa invites online Percentage Rate tender from approved and eligible contractors/ agencies.

**Tender Schedule:**

**1.** The last date of online submission of tender is **03/03/2025 up to 13:00 hrs.**
**2.** The date & time of opening of online tender is **05/03/2025 after 11:30 hrs.** In the Office of Village Panchayat Alorna, Pernem - Goa.

For all participation & other details visit on e-tendering website
**https://eprocure.goa.gov.in**

Sd/- Mrs. Siddhi S. Raul (Seal)
Sarpanch
Village Panchayat Alorna, Pernem-Goa.

**Transfer of Vehicle**

I Chaya Dilip Mardolkar, r/o H. No. 237, Near Maruti Temple, Merces, Goa 403005 wish to transfer the Skoda Rapid Car bearing registration No. GA 07 N 7911 in my name which was registered in the name of my late son Deepikesh Dilip Mardolkar.

Any person is/are having any objection to the said transfer of vehicle should submit the same to The Directorate of Transport Panaji within 15 days of publication of the notice.

Sd/- Chaya Dilip Mardolkar

Email : cbicourt-ngde.goa@nic.in
Phone: 2264250/2264251
DJ-2/MAP/Civil/EXA-213-2021/2025/
Dated : 15.02.2025
To be publish on Local Daily Newspaper (U/o V r. 20 CPC)

IN THE COURT OF DISTRICT JUDGE-2, RAJ RAUNAK BUILDING, MAPUSA
(Before Shri. Ram S. Prabhudessais, District Judge-2 Mapusa)

**Execution Application No. 213/2021**

The Lokmanya Multipurpose Co-operative Society (Multi-state) ....Decree Holder

V/s

Shri. Govind Madhu Dhargalkar & 4 Ors. .... Judgment Debtors

**NOTICE**

To, **The Judgment Debtor No.**

**2.** Shri. Ambrose Dsouza (Mem No. 164958) (R) H. No. 258, Padri Wado, Gauvim, Thivim, Bardez-Goa. (O) Hotel La CALYPSO, Saunta Wado, Baga, Calangute, Goa. 403516.

WHEREAS, the above named Decree-Holder have instituted a Execution Application against you.

AND WHEREAS, notices have been issued to you returned unserved with the endorsement left the premises long back and whereabouts is not known.

AND WHEREAS, Adv. Ms. A. Bhamaikar holding for Adv. Ms. N. Shivolkar, advocate for the Decree-Holder have filed an application in this Court praying that you be served by Substituted service by publication in the Daily Newspaper circulating in the locality on which the said JD No. 2 was last known to have actually and voluntarily resided.

AND WHEREAS, this Court is satisfied that this is a fit case for ordering such a service.

NOW, therefore, notice is hereby given to you under order V Rule 20(A) of C.P.C. to appear before the Court of District Judge-2 & Addl. Sessions Judge, Mapusa, Raj Raunak Bldg. Shetye Waddo, Duler Mapusa either in person or by a untitled folder 10 pleader duly instructed, if any on **10th day of March, 2025 at 10.00 a.m.**

TAKE FURTHER, notice that in default of your appearance on the day and time aforementioned, the matter will be heard and determined in your absence.

GIVEN under my hand and the Seal of the Court, this 17th day of the Month of February, 2025.

**Sd/- (Ram S. Prabhudessai)** (SEAL)
**District Judge-2 & Addl. Sessions Judge, Mapusa**

**OFFICE OF THE VILLAGE PANCHAYAT MOLCORNEM QUEPEM – GOA.**

Ref No.VPM/Tender Notice/2024-25/1217 **TENDER NOTICE** Date:- 18/02/2025

The Sarpanch of Village Panchayat Molcornem hereby invites Sealed Percentage rate tenders from approved and eligible contractors of CPWD and those of appropriate list of Union territories/States/PWD/WRD/ MES/ Railways, **up to 12.00 pm** on **04/03/2025** for the below mention work.

| Sr. No. | Name of Work & Location | Estimated Cost put to tender | EMD | Cost of Tender forms | Time limit | Class and Category of Contractor: New | Class and Category of Contractor: Old |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Construction of drainage and covering near John Sequeira house to Newwaddo Junction in Ward No. 4 at Newwaddo in V. P. Molcornem. | Rs. 443652.75 | Rs. 8873.05 | Rs. 4000/- | 60 days | Class V & above RBLD | Class IV & above RBLD |

The tender will be opened at **3.00 pm on the same day i.e. 04/03/2025,** in the Office of Village Panchayat Molcornem. The last date of receiving the application along with necessary documents for issue of tender document is on **25/02/2025 upto 12.00 pm.** The contractor must produce the following documents along with the application. **1.** Attested copy of the valid registration certificate of the contractor in the concern category of work **2.** Attested copy of the valid Income Tax clearance certificate. **3.** Attested copy of the valid GST Registration and Acknowledgements of updated filed return with ARN. **4.** A Declaration of work in hand with detail list indicating their present status. **5.** Attested copy PAN Card. **6.** Demand draft towards EMD drawn in favor of "The Sarpanch Village Panchayat Molcornem" at the time of application for each work separately. **7.** Unsealed and conditional tender will be rejected outright. In complete application shall not be considered for issue of tender forms. The Payment of tender form will be accepted on **03/03/2025, up to 11.30, am** and the tender forms can be avail from this Office on same day up to **03.00 pm.** The estimated cost put to tender is exclusive of GST. All the formalities should be completed as per the rule. The Sarpanch reserves the right to reject the Tender including the lowest one without assigning any reason is reserved.

(Seal) Sd/- ( Shri. Rajesh R. Gaonkar ) Sarpanch, V. P. Molcornem.

**THE VILLAGE PANCHAYAT MOLCORNEM, QUEPEM – GOA 403705**

Ref No.VPM/Q/NIT/2024-25/ 1216 **TENDER NOTICE (E-TENDERING MODE ONLY)** Date:- 17/02/2025

The Sarpanch of Village Panchayat invites on behalf of V.P. Molcornem Quepem Goa, online Percentage Rate tenders from approved and eligible contractors / agencies for the following works.

| Sr. No. | Name of Work & Location | Estimated Cost put to bid (EXcluding GST) (in Rs.) | Earnest Money Deposit (in Rs.) | Cost of Tender Document (in Rs.) | Tender Processing fee (in Rs.) | Class and Category of Contractor: As per Old Registration | Class and Category of Contractor: As per new registration | Period of Completion |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Mode of payment : e payment only | | | | | |
| 1. | Black topping of existing road from main road to Franky Colaco house at Devlamol in W. No. 2 in V. P. Molcornem. | 776827.32 | 15537/- | 5000.00 | 1554/- | Class III & above RBLD | Class IV & above RBLD | 60 days |
| 2. | Construction of retaining wall near Sanjay Gaonkar house at Gaonkarwaddo in ward No. 3 of V. P. Molcornem. | 793192.42 | 15864/- | 5000.00 | 1586/- | Class III & above RBLD | Class IV & above RBLD | 60 days |
| 3. | Construction of retaining wall near Shashikant Gaonkarwaddo in W. No. 3 in V. P. Molcornem. | 791293.97 | 15826/- | 5000.00 | 1583/- | Class III & above RBLD | Class IV & above RBLD | 60 days |

**TENDER SCHEDULE : 1.** The last date of online application & submission of tender is **03 /03/2025 upto 13.00 hrs.**
**2.** Tender online will be opened at **10:30 hrs on 04/03/2025** in the office of the V.P. Molcornem Quepem Goa.
For all participation and other details visit on e-tendering website
**https://eprocure.goa.gov.in**

(Seal) Sd/- ( Rajesh R. Gaonkar ) Sarpanch, V. P. Molcornem